**महाराष्ट्र शासन**

**अधीक्षक अभियंता व प्रशासक यांचे कार्यालय,**

लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर
सिंचन भवन, गुरुनानक चौक, सोलापूर- 413003

Email :- seacada_spr@yahoo.co.in — दूरध्वनी क्र. 0217-2740661 / 2740662

# सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित करणे बाबत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/ 13 दिनांक 17/12/2016 अनुसार खालील संवर्गातील फक्त जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांना करार पध्दतीने या मंडळांतर्गत कार्यरत असलेल्या उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भीमानगर / भीमा पाटबंधारे विभाग, पंढरपूर / भीमा विकास विभाग क्र. 2, सोलापूर / सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर या विभागांतर्गत सोलापूर / पुणे / अहमदनगर जिल्ह्यांतर्गत क्षेत्रीय स्तरावरील सिंचन व्यवस्थापन व बांधकामाधीन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी करार पध्दतीने एक वर्षासाठी नेमणूक करावयाची आहे. सेवानिवृत्त अधिकारी / अभियंत्यांची सेवा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर यांचे अधिनस्त कामासाठी राहील. सेवानिवृत्त अधिकारी / अभियंत्यांना सिंचन व बांधकाम प्रकारचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर यांच्याकडे दि. 31/07/2021 ते दि. 13/08/2021 ( सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत ) प्राप्त होतील याप्रमाणे eesid@ymail.com या ई-मेलद्वारे अथवा प्रत्यक्ष सादर करावे. प्रत्यक्ष सादर करतेवेळी अर्जाचे पाकीटावर "कनिष्ठ अभियंता या पदावर करार पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहावे. ई-मेलद्वारे अर्ज सादर करतेवेळी PDF स्वरुपात सर्व कागदपत्रांसह सादर करावेत.

### करार पध्दतीवर भरावयाचा पदाचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | संवर्ग व कार्यालयाचे नांव | विवक्षित कामाचा तपशिल | जलसंपदा विभागातून खालील पदावरुन सेवानिवृत्त. |
|---|---|---|---|
| 1 | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (पदांची संख्या - 07) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर | क्षेत्रीय स्तरावरील सिंचन / बांधकामाधीन प्रकल्पांची कामे. | सेवानिवृत्त सहा.अभियंता श्रेणी-2 / कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / उपविभागीय अभियंता / अधिकारी |

**टिप :** वरील पदसंख्येत प्रशासकीय कारणास्तव बदल करणेचा अधिकार अधीक्षक अभियंता व प्रशासक यांना राखून ठेवणेत येईल.

सदर नेमणूकी करिता लागू असलेल्या अटी व शर्ती कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर या कार्यालयात संबंधित उपकार्यकारी अभियंता यांचेकडे उपलब्ध आहे.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण.

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| 1 | कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर सिंचन भवन, ऑफिसर्स क्लब समोर, सोलापूर - 413 003 | 0217-2740663 | eesid@ymail.com |

### सदर नेमणूका ह्या खाली सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील.

1 अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांना कनिष्ठ अभियंता पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

2 अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / अभियंत्यांविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही तसेच शासकीय येणे बाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र अर्जदार ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले आहे. त्या कार्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

3 करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत व नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु.100/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देण्यात यावा.

4 नियुक्त अर्जदाराला महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण-2715/प्र.क्र.100/13 दिनांक 17/12/2016 मधील अटी व शर्तीप्रमाणे त्यांना पारिश्रमिक भत्ता, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

5 नियुक्ती प्राधिकारी ( अधीक्षक अभियंता ) यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहील.

6 करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

7 क्षेत्रीय स्तरावर करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्‌भवल्यास कार्यालय / शासन बांधील राहणार नाही.

8 करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

9 अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे निवृत्तीवेतन मंजूरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत / निवृत्तीचे कागदपत्र सादर करावेत.

10 करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

11 सदर नेमणूक 1 वर्षाच्या पुढे वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

12 करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी तसेच त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

13 मुलाखतीकरिता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलद्वारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघु संदेशाद्वारे कळविण्यात येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर व कार्यकारी अभियंता, सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर यांचे सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच अंतिम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तिक ई-मेल वर कळविण्यात येईल.

उपरोक्त 1 ते 13 अटी व शर्ती मला मान्य आहेत ह्याबाबतचे अर्जदाराने रु.100/- स्टॅम्प पेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील. सदर नियुक्ती आवश्यक सिंचन व बांधकाम कामासाठी करण्यात येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास काही पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार समितीस आहे.

सही/-
**कार्यकारी अभियंता,**
सोलापूर पाटबंधारे विभाग, सोलापूर

सही/-
**अधीक्षक अभियंता व प्रशासक**
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर

# विहित नमुन्यातील अर्ज

## पायाभूत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट

**कनिष्ठ अभियंता संवर्ग (करार) या पदासाठी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांच्या सेवा विविध कामाकरिता कंत्राटी पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे बाबत अर्ज.**

प्रति,

मा.अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर 413003.

उमेदवाराचे अलीकडील काळातील स्वतःचे छायाचित्र येथे चिकटावे.

अर्ज केलेल्या पदाचे नांव :-

1) अर्जदाराचे नांव :-
2) कायमचा पत्ता :-
3) दूरध्वनी क्रमांक :-
भ्रमणध्वनीसह (अनिवार्य) :-
4) ई-मेल (अनिवार्य) :-
5) सध्याचा पत्ता :-
6) जन्म तारीख :-
7) राष्ट्रीयत्व :-
8) प्रवर्ग :-
9) लिंग (पुरुष / महिला ) :-
10) अवगत भाषा :-
11) शैक्षणिक माहिती :-

| अ. क्र. | अभियांत्रिकी पदवी / पदविका (स्थापत्य) | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | महाविद्यालयाचे नांव | विद्यापीठाचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |

12) इतर शैक्षणिक माहिती (संगणक इत्यादी )

| अ. क्र. | अभ्यासक्रम | वर्ष | संस्थेचे ( प्रायोजक) नांव |
|---|---|---|---|
| 1 | | | |

13) अनुभव :-

| अ. क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नांव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात ) |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |

14) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

15) सद्य:स्थितीत काम करीत असल्याचा तपशील :-

मला पूर्णपणे माहिती आहे की, पायाभूत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट द्वारे प्रकल्पाचे क्षेत्रीय कामाकरीता सेवानिवृत्त अधिकारी / अभियंता यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी कनिष्ठ अभियंता या पदाकरिता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे प्रकल्पाचे कामासाठी 1 वर्षाकरिता आहे व कामाचे व्याप्तीप्रमाणे कमी / अधिक करण्यात येतील. कामाच्या निकडीनुसार पुणे / सोलापूर / अहमदनगर जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यात माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहितीप्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्व सूचनेशिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

सहपत्र :-

अर्जदाराची सही :- ____________

नाव :- ____________